दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २०३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१७ ऑक्टोबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दाऊदवर मोठी कारवाई, संपत्तीचा होणार आतापर्यंतचा सर्वात मोठा लिलाव

दै.रायगड नगरी । मुंबई

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमवर मोदी सरकार कडक कारवाई करणार आहे. त्यांच्या महाराष्ट्रातील मालमत्तेचा सर्वात मोठा लिलाव नोव्हेंबरमध्ये होणार आहे. लिलाव तस्करी आणि विदेशी विनिमय हाताळणी कायद्यांतर्गत घेण्यात येईल. या अंतर्गत १० नोव्हेंबरला दाऊदच्या ७ मालमत्तांचा लिलाव होणार आहे. कोरोनामुळे, हा लिलाव व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे केला जाईल.

दाऊदच्या मालमत्तेचीहा आतापर्यंतची सर्वात मोठा लिलाव होणार आहे. एकाच वेळी त्याच्या सुमारे ७ मालमत्तांचा लिलाव होईल. यापैकी ६ मालमत्ता महाराष्ट्रातीलरत्नागिरी जिल्ह्यातील मुंबाके गावात आहेत. यापूर्वी दाऊदच्या महाराष्ट्र आणि मुंबईतील अनेक मालमत्तांचा लिलाव झाला आहे.

कोरोनाचा अंदाज घेवूनच दिवाळीनंतर शाळा सुरू करू : उपमुख्यमंत्री

दै.रायगड नगरी । पुणे

शाळा सुरू होणार की नाही, अशी चर्चा सुरू आहे. पण दिवाळीपूर्वी राज्यातील शाळा सुरू होणार नाहीत. तसेच दिवाळीनंतरही कोरोनाचा अंदाज घेऊनच शाळा सुरू करण्याबाबतचा निर्णय घेतला जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी येथे स्पष्ट केले.

डिसेंबर-जानेवारीमध्ये कोरोनाची लाट येण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी अधिक जबाबदारीने वागावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केली.

राज्य शासन व पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या वतीने आयोजित 'माझे कुटूंब माझी जबाबदारी' या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. पवार म्हणाले,

देशातील काही राज्यांमध्ये शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. पण शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कोरोनाचा संसर्ग होण्याचे प्रमाण वाढू लागले. हे लक्षात आल्यानंतर तेथील शाळा बंद करण्यात आल्या. त्यामुळे राज्यात दिवाळीपूर्वी शाळा सुरू होणार नाहीत. दिवाळीनंतरही अंदाज घेतल्यानंतरच शाळा सुरू केल्या जातील. कोरोनाची परिस्थिती सुधारत असली तरी ते त्याकडे दुर्लक्ष नको. नियमांचे काटेकोर पालन करायला हवे. दुसऱ्या लाटेचा अंदाज खोटा ठरवायचा असेल तर अधिक खबरदारीने वागायला हवे. मागील सात महिन्यांपासून आपण कोणताही सण साजरा करू शकलो नाही. येणारे नवरात्रही साधेपणाने करू. विनाकारण गर्दी करू नये, असा आवाहनही पवार यांनी केले.

संक्षिप्त...

मराठा आरक्षणाची स्थगिती उठणार? निकाल २७ तारखेला

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

मराठा आरक्षणावर दिलेली तात्पुरती स्थगिती मागे घेण्यात यावी, यासाठी राज्य सरकारकडून दोन अर्ज सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आले आहेत. मराठा आरक्षण प्रकरणात न्या. एल. नागेश्वर राव यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय पूर्णपीठासमोर २७ ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे. या सुनावणीत स्थगिती उठविली जाणार की कायम राहणार? याचा निकाल समोर येण्याची आशा व्यक्त केली जातेय.

महाराष्ट्रात सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात मराठा आरक्षणावर लावण्यात आलेली स्थगिती संपुष्टात आणण्यासाठी महाराष्ट्राच्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलीय. या प्रकरणाची सुनावणी आता २७ ऱ्क्टोबर रोजी होणार आहे. उल्लेखनीय म्हणजे, पूर्वी आरक्षणाला स्थगिती दिलेल्या पीठामोरच ही सुनावणी पार पडणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठात न्यायमूर्ती नागेश्वर राव, न्या. अजय रस्तोगी, न्या. हेमंत गुप्ता यांचा समावेश आहे. अनेकांचं लक्ष या निकालाकडे लागून राहिलंय.

मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी सेवेत आरक्षण देणाऱ्या राज्य सरकारच्या कायद्याला सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर रोजी अंतरिम स्थगिती दिली होती. ही स्थगिती उठवण्यासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी आंदोलने आणि मोर्चे काढले जात आहेत. सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण टिकण्यासाठी केंद्र सरकारनं कायद्यात बदल करावा, अशी सकल मराठा समाजाच्या कोल्हापूर मेळाव्यात करण्यात आली. इतकंच नाही, तर आपल्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर, 'मराठ्यांची ताकद दिल्लीत दाखवू' असा इशाराही सकल मराठा समाजाकडून देण्यात आलाय. यासाठी २९ ऑक्टोबरला पुण्यात पुढील आंदोलनाचे रणशिंग फुंकण्याचा निर्धारही मागणीकर्त्यांनी व्यक्त केलीय.

कोकणातील विविध प्रश्न जलदगतीने सोडवावेत : ना.अब्दुल सत्तार

दै.रायगड नगरी । मुंबई

कोकणातील ग्रामीण भागातील विविध प्रश्न, खारभूमीचे प्रश्न, बंदरे, जेट्टी, मच्छिमारांचे प्रश्न, अतिवृष्टी आणि वादळामुळे झालेले नुकसान अशा विविध विषयांच्या अनुषंगाने काल महसूल, ग्रामविकास, बंदरे आणि खारजमीन विकास विभागाचे राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार यांनी या चारही विभागांचा आढावा घेतला. कोकणातील सर्व जिल्ह्यातील आमदारांनी सहभागी होत आपापल्या मतदारसंघांचे प्रश्न मांडले. कोकण हा किनारपट्टीचा प्रदेश असून नुकतेच झालेले वादळ आणि अतिवृष्टीमुळे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. सर्व विभागांनी समन्वयाने काम करुन कोकणातील पायाभूत सुविधांची निर्मिती, ग्रामीण पर्यटन, खारभूमी, बंदरे, जेट्टीविषयक प्रश्न जलदगतीने सोडवावेत, असे निर्देश राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार यांनी संबंधीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

कोकणातील जेट्टी आणि बंदरांविषयक विविध प्रश्न, सागरमाला योजनेची अंमलबजावणी, सीआरझेडसंबंधीत विविध विषय या अनुषंगाने केंद्रीय मंत्र्यांना भेटून त्यांच्याशी चर्चा करुन हे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेऊ, असेही राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार यांनी यावेळी सांगितले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस उद्योग राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कुमारी अदिती तटकरे, खासदार विनायक ..../२

घरफोडी, चोरी करणारे चोरांना २४ तासात नेरळ पोलिसांनी केले जेरबंद

दै.रायगड नगरी । अलिबाग

नेरळ पोलीस ठाणे येथे फिर्यादी रा.१/८ दीपांजली महात्मा फुले रोड, भोईरवाडी विष्णुनगर, डोंबिवली पश्चिम, ता. कल्याण, जि.ठाणे यांनी त्यांचे मौजे पाषाणे गावात खडकवाडी रोडला लागून कावेश्री प्रांगण नावाने बांधकाम चालु असलेल्या इमारतीमध्ये तसेच कार्यालयात असलेला संगणकाचा मॉनिटर, एल.ई.डी.टीव्ही, बोरिंग पंप, बेड, सोफा सेट, सिलिंग फॅन, सिंटेक्सच्याटाक्या, प्लंबिंगचे मटेरियल, टाईल्सचे बॉक्स, डायनिंग टेबल व सी.सी.टी.व्ही. डीव्हीआर मशीन व कॅमेरे इत्यादी प्रकारचा एकूण १,७५,०००/- रुपये किमतीचा माल अज्ञात चोरांनी लॉकडाऊन कालावधीचा फायदा घेऊन घरफोडी चोरी करून चोरल्याची तक्रार दिल्याने नेरळ पोलीस ठाणे येथे कॉ. गु. रजि. नं. ११३/२०२० भा.द.वि. सं.कलम ४५४, ४५७, ३८०, ४२७ प्रमाणे दिनांक ०९/१०/२०२० रोजी १७.३३ वा. गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हादाखल होताच नेरळ पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री.अविनाश पाटील यांनी गुन्ह्याचा तपासाची सूत्रे हातात घेऊन वरिष्ठांच्या सूचनांप्रमाणे पोलीस ठाणे ..../२

सिडको विरोधात अखिल भारतीय किसान सभेचा एल्गार

प्रकल्पग्रस्त वाढीव मोबदल्या पासून वंचित

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : सिडको प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणारी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम तातडीने वितरीत करण्यास केलेल्या विलंबनाच्या निषेधार्थ अखिल भारतीय किसान सभेने धरणे आंदोलनाचे बिगुल फुंकले असून येत्या १९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० :०० ते सायंकाळी ५ : ०० या कालावधीत हे आंदोलन उरण बोकडविरा येथील सिडकोच्या द्रोणागिरी व मेट्रोसेंटर कार्यालयासमोर आयोजित केले असल्याची माहिती भारतीय किसान सभेचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे यांनी दिली आहे.

या संदर्भात त्यांनी कोकण आयुक्त सीबीडी बेलापूर,जिल्हाधिकारी रायगड व विशेष भूसंपादन अधिकारी मेट्रोसेंटर उरण - पनवेल यांनाही निवेदन देण्यात आले असून निवेदनात म्हटले आहे कि सन १९७० व १९८६ साली शासनाने सिडको तर्फे नवीमुंबई प्रकल्पाकरिता ठाणे,पनवेल व उरण तालुक्यांतील ९५ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोलच्या भावात संपादीत केल्या संपादीत शेतजमिनीची नुकसान भरपाई

म्हणून रक्कम व शासनाची साडेबाराटक्के योजने प्रमाणे विकसित भूखंड देण्याचे कबूल केले होते.मात्र आज ५० वर्षा नंतरही नुकसान भरपाईची रक्कम व साडेबाराटक्के विकसित भूखंडा पासून शेतकरी वंचित राहिले आहेत.या कडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन असून याची दखल न घेतल्यास एक महिन्या नंतर हे आंदोलन तीव्र करण्यात येऊन सिडकोच्या बेलापूर येथील मुख्य कार्यालयासमोर आंदोलन सुरु करण्याचा इरादा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नवीमुंबई प्रकल्पाकरिता महाराष्ट्र शासनाने सिडको मार्फत भूसंपादन कायदा कलम ४ प्रमाणे नोटिफिकेशन करण्यात आले होते. मात्र ..../२

तीनशेपेक्षा जास्त लोकसंख्येच्या वाड्यांचे महसूली गावांमध्ये रूपांतर करा

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे जिल्हा प्रशासनाला निर्देश

दै.रायगड नगरी । अलिबाग

रायगड जिल्हा डोंगराळ भागांमध्ये मोडत असून जिल्ह्यामध्ये वाडयांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. केंद्र व राज्य शासनाची धोरणे, योजना व कायद्याची प्रभावी व गुणात्मक अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामस्तरीय महसूल यंत्रणा सक्षम करणे आवश्यक आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार ज्या वाड्यांची लोकसंख्या तीनशेपेक्षा अधिक झाली असेल अशा वाड्यांचे महसूली गावांमध्ये रूपांतर करणे आवश्यक आहे.

या बाबींचा विचार करून जिल्ह्यातील विशेषतः ग्रामीण व डोंगरी भागातील प्रशासकीय यंत्रणा सक्षम व सबल करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात वाड्यांचे महसूली गावांमध्ये रूपांतर करण्याची आवश्यकता असल्याने त्यानुषंगाने पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी सन २०१२ मध्ये ज्या वाड्यांचे महसूली गावांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे, अशा गावांचे महसूली अभिलेख स्वतंत्र करावेत, जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी या कामासाठी कृती आराखडा तयार करून संपूर्ण कार्यवाही साधारणत: एक महिन्यामध्ये पूर्ण करून तसा अहवाल सादर करावा, सध्या ज्या वाड्यांची लोकसंख्या तीनशेपेक्षा अधिक झाली असेल अशा वाड्यांचे महसूल गावांमध्ये रूपांतर करण्यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्याकडून साधारणत: एक आठवड्याच्या आत माहिती संकलित करून प्रस्ताव प्राप्त करावेत, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यपद्धती अवलंबून महसूली गावांची अंतिम अधिसूचना साधारणत: दोन महिन्यात प्रसिद्ध करावी, त्यानंतर भूमी अभिलेख विभागाने महसूली गावांचे महसूली अभिलेख स्वतंत्र करण्याची कार्यवाही पुढील एक महिन्यात पूर्ण करावी. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणी स्वयंस्पष्ट कार्यपद्धती विहित करावी व त्याबाबतचे परिपत्रक संबंधित सर्व विभागांना निर्गमित करावे, त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी संपूर्ण कार्यवाही डिसेंबर २०२० पर्यंत पूर्ण करावी, याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल दरमहा मंगळवारी ..../२

सहा दिवस लॉच सेवा बंद ठेवल्याने मोरा-भाऊचा धक्का सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक कोलमडणार

दै.रायगड नगरी । उरण

समुद्राच्या ओहटीमुळे मोरा - भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी लॉचेस १५ ते २० ऑक्टोंबर पर्यंत सलग सहा दिवस दुपारनंतर बंद ठेवण्यात आली असल्याची माहिती मोरा बंदर निरिक्षक प्रभाकर पवार यांनी दिली आहे.मोरा - भाऊचा धक्का मुंबई या जलद आणि शॉर्टकट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सागरी मार्गावरुन दररोज कोरोना दरम्यानही शेकडो प्रवासी प्रवास करीत आहेत.सध्या मोरा बंदर गाळाने भरलेले आहे.

गाळ साचल्याने समुद्राच्या ओहटीमुळे प्रवासी बोटी जेट्टीपर्यंत पोहचत नाहीत.परिणामी उधाणाच्या ओहटी दरम्यान या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक काही दिवसात काही काळासाठी बंद ठेवण्याची नामुष्कीची पाळी येते.यामुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होते.उधाणाच ओहोटीच्या प्रवासी वाहतूक बंद पडणे ही बाब आता प्रवाशांच्या ही अंगवळणी पडली आहे.येत्या या सागरी मार्गावरील प्रवासी लॉचेस १५ ऑक्टोबर पासून २० ऑक्टोंबर पर्यंत सलग सहा दिवस दुपारनंतर बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मोरा बंदर निरिक्षक प्रभाकर पवार यांनी दिली आहे.

खांदा वसाहतीत पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाला शिवसेनेने पिटाळले

दै.रायगड नगरी । पनवेल

खांदा वसाहत आज पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या कारवाईला शिवसेनेने विरोध केला लॉकडाऊन नंतर अनलॉक प्रकिया सुरू झाली आहे. हळूहळू अनेक व्यवसाय सुरू झाले आहेत. पण आजही मुंबईला जाणारा चाकरमानी जाण्यासाठी कोणतीही सुविधा नसल्याने कामावर जाऊ शकत नाही कोरोना काळात अनेकांच्या नोकर्या गेल्या असे अनेक बेरोजगार फूटपाथवर व्यवसाय करून दिवसाकाठी ३०० ते ५०० रूपये कमवितात अशा कठीण प्रसंगी अशा गरिबांन वर कारवाई करून महापालिका काय साध्य करतेय उलट नोकर्या गेलेल्या लोकांना शासनाच्या माध्यमातून महापालिकेने मदत करायला हवी असा सवाल करीत शिवसहकार सेना रायगड जिल्हा सचिव संपत सुवर्णा यांनी ..../२

गुप्तधनासाठी भंगारची दुकान पालथी?

दै.रायगड नगरी । तळा

आजकाल झटपट पैसे मिळवण्यासाठी लोक काय करतील याचा काही नेम नाही, झटपट पैसे मिळावे म्हणून आजकाल लोक काहीही करतात काही जण फसवाफसवी करतात तर काही जण चोऱ्यामाऱ्या करतात. पैसे मिळवण्यासाठी लोक कित्येक गुन्हे देखील करतात. त्यातलीच काही मंडळी जादूटोण्याकडे देखील वळतात. काही जण एकवीस नखांच कासव शोधतात, तर काहीजण चक्क घुबड, साप असे प्राणी देखील शोधतात, काही जण तर गुप्त धन शोधण्यासाठी चक्क रात्रभर जागून हाताने जमिनीला खोलवर खड्डे खणतात असं देखील ऐकिवात आलंय.

गुप्तधन शोधण्यासाठी पैश्याचा पाऊस पाडण्यासाठी कित्येक प्राण्यांचे बळी देखील घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. आता मात्र या जादूटोण्यासाठी लोक बाजारात एक वस्तू शोधत

असताना दिसतायत. हि वस्तू शोधण्यासाठी कित्येकांनी मोठमोठी भंगारची दुकाने देखील उपसली आहेत इतकच काय बाजारातले इलेक्ट्रॉनिक वस्तू रिपेरिंग करण्याचं एक दुकान देखील शिल्लक विचारपुशीपासून शिल्लक ठेवलं नाही. इतकं वाचल्यावर आपल्याला प्रश्न पडला असेल कि हि वस्तू नक्की आहे तरी कुठली ? हि वस्तू दुसरी तिसरी काही नसून जुन्या टिव्ही रेडिओ मध्ये वापरात येत असलेला काचेचा व्हॉल आहे. हे व्हॉल वापरणं इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात काही वर्षांपूर्वीच कालबाह्य झालय. ह्यांचा वापर सध्या जगात कुठेच केला जात नाही. ह्याच उत्पादन कधीच थांबलं आहे. पण आज याच व्हॉल साठी जो आता इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात काहीच कामाचा नाही त्याची आता मागणी जादूटोणेवाले वाट्टेल ती देयला तयार आहेत. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात कालबाहय झालेला व्हॉल पुन्हा जादूटोण्यासाठी महत्वाचा ठरत आहे. जादूटोणा हा प्रकार जरी नसला तरी गुप्तधन मिळवण्याच्या हेतूने ह्या कवडीमोलाच्या व्हॉल साठी आपल्या चपला आणि वेळ झिजवत आहेत. पण व्हॉल च्या नादात गुप्तधन मिळण्याच्या आयवजी जेलची हवा खायला नाही मिळाली म्हणजे झालं.

आभाळ फाटले

ऑक्टोबरमध्ये होणारा पाऊस धडकी भरविणारा असतो, याची प्रचिती यंदाही येत आहे. कमी कालावधीत मुसळधार कोसळत झोडपून काढणारा परतीचा पाऊस आपत्तीकारक ठरत असल्याचा गेल्या काही वर्षांचा अनुभव आहे. पुणे, सोलापूर, सातारा, सांगली यांसह पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागांत; तसेच मराठवाडा आणि तेलंगण, आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यांत बुधवारी अतिवृष्टीने हाहाकार उडवून दिला असून, तेथील बहुतेक ओढ्यांना आणि नाल्यांना पूर आला आहे. तुडुंब भरलेल्या धरणांतून विसर्ग सुरू झाला असून, अनेक ठिकाणी नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. रस्ते वाहून जाण्याचा, पूल पाण्याखाली जाण्याचा, अन्य भागांशी संपर्क तुटण्याचा प्रकार घडला आहे. आंध्र, तेलंगणमध्ये २९ जण मृत्युमुखी पडले आहेत. महाराष्ट्रातही पंढरपूरमध्ये घाटाची भिंत कोसळून सहा जण ठार झाले आहेत. पुणे जिल्ह्यात दौंडमध्ये चार जण वाहून गेले आहेत. या सर्व भागांत खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, काही ठिकाणी डाळिंब आणि केळीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र आंध्र, तेलंगण, महाराष्ट्र या दिशेने सरकल्याने ही अतिवृष्टी झाली. हवामान विभागाने याचा अंदाज दोन दिवस आधीच दिला होता. चक्रीवादळाच्या अंदाजानंतर त्याची दखल घेऊन, पूर्वतयारी करण्याची यंत्रणा देशात आता विकसित झाली आहे; त्यामुळे चक्रीवादळाच्या संकटाची तीव्रता कमी झाली आहे. अतिवृष्टीच्या इशाऱ्यानंतर अशा प्रकारे पूर्वतयारी करणारी यंत्रणा मात्र विकसित झालेली नाही. परिणामी, आधी कल्पना येऊनही संकटाची तीव्रता कायम राहिल्याने मोठे नुकसान होत आहे. गेल्या काही वर्षांपासून अतिवृष्टीचे प्रमाण वाढूनही आणि रस्ते वाहून जाण्यापासून भिंत कोसळून जीवितहानी होण्याच्या दुर्घटना होत असूनही, त्यांपासून कोणताही धडा घेतला गेलेला नाही. नद्या-नाल्यांतील अतिक्रमणे हटविली नसल्याने धोका कायम आहे. पुण्यात बुधवारी रात्री साडेनऊपासून दोन तास भीतिदायक पाऊस झाला. गेल्या वर्षी २५ सप्टेंबरच्या रात्रीही असाच आभाळ फाटल्यासारखा पाऊस होता. एरवी पुणेकरांच्या खिजगणतीतही नसलेल्या आंबिल ओढ्याने त्यावेळी अक्राळ-विक्राळ रूप धारण केल्याने मोठे नुकसान झाले होते. बुधवारची रात्रही अशीच काळरात्र ठरते की काय, अशी भीती वाटत होती. अवघ्या दोन तासांत सरासरी शंभर मिलिमीटर पाऊस झाल्याने कात्रज, सहकारनगर, सिंहगड रोड, शिवाजीनगर, हडपसर अशा पुण्याच्या सर्वच भागांत रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले. पाणी साठण्याची ठिकाणे माहीत असूनही, तिथून निचरा करणारी यंत्रणा स्थानिक प्रशासन निर्माण करू शकलेले नाही. सिंहगड रस्त्यावर गेल्या वर्षी जो पूल वाहून गेला होता; तो नव्याने बांधून काही महिनेही झालेले नसताना तोही बुधवारी वाहून गेला. तो कच्चा पूल होता, असा युक्तिवाद आता केला जात असला, तरी या महत्त्वाच्या विषयाबाबत महापालिका किती गंभीर आहे, हे यातून स्पष्ट होते. भिंती कोसळण्याच्या; तसेच अनेक सोसायट्यांत पाणी शिरण्याच्या घटना घडल्या. पावसाने रुद्रावतार धारण केल्याचे लक्षात आल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले आणि पूरस्थिती असलेल्या ठिकाणाहून स्थलांतराचे प्रयत्न झाले. हवामान खात्याने पूर्वकल्पना देऊनही ही बाब उशिरा का करण्यात आली, असा प्रश्न आहे. पुण्याच्या ग्रामीण भागांतही बिकट स्थिती होती. इंदापूर, दौंड, बारामती या भागांत अतिवृष्टी झाली. दौंडमध्ये ओढ्यांना आलेल्या पुरात चार जण वाहून गेले. बारामती-फलटण रस्ता वाहून गेला. तेथील १८ गावे पूरग्रस्त असून, तिथे राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या तुकडीला पाचारण करण्यात आले. या सर्व भागांत बुधवारी काही तासांत सरासरी १३० मिलिमीटर पाऊस झाला. सोलापूर आणि लातूर-उस्मानाबाद हे एरवी दुष्काळी म्हणून ओळखले जाणारे जिल्हे. त्यांना या पावसाचा सर्वांत मोठा फटका बसला. सोलापुरात ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराचे तलावात असलेल्या मंदिरात पाणी शिरले. पंढरपूरमध्ये चंद्रभागेच्या तीरावरील कुंभारघाटावर नव्याने बांधण्यात आलेल्या घाटाची भिंत कोसळून सहा जण मृत्युमुखी पडले. तुळजापुरात दरड कोसळली, उस्मानाबादमध्ये १७ शेतकरी अडकले. सांगली, सातारा, कोल्हापूर या भागांनाही पावसाने झोडपले. यामुळे शेतीचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. भुईमुग, सोयाबीन यांच्यावर परिणाम झाला असून, अनेक ठिकाणी पिके भुईसपाट झाली आहेत. ही पिके आणखी काही दिवस पाण्यात राहिल्यास ती वाया जाण्याची भीती आहे. कणसात पाणी साठल्याने ज्वारी काळी पडण्याचीही भीती आहे. पुणे आणि सांगली जिल्ह्यातील फळबागांचे नुकसान झाले आहे. हे नुकसान नेमके किती आहे, याचा नेमका अंदाज पंचनामे केल्यानंतरच येईल. आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवरील संकट या वादळी पावसामुळे आणखी गडद झाले. अशा आपत्तीनंतर सरकारकडून मदतीचे आश्वासन दिले जाते. कधीतरी पथक तपासाला जाते. नुकसानीचा आकडा काढला जातो आणि टप्प्याटप्प्याने थोडीफार मदत दिली जाते; मात्र प्रचंड मेहनत करून हाताशी येत असलेले पीक काही तासांच्या पावसाने वाहून जाण्याने शेतकऱ्यांना होणारी व्यथा अशा मदतीने मोजता येत नाही. तापमानातील बदलामुळे टोकाचे हवामान अनुभवण्यास मिळेल, अतिवृष्टीच्या-दुष्काळाच्या घटना वाढतील अशा इशारा शास्त्रज्ञ गेल्या दोन दशकांपासून देत आहेत. त्याकडे आता गांभीर्याने पाहण्याची गरज असून, आतापर्यंतच्या संकटापासून धडे घेत, सर्व नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाण्यासाठीची यंत्रणा विकसित करायला हवी, तरच संकटाची तीव्रता कमी होऊ शकेल.

कामोठेतील रक्त आणि प्लाझ्मा दान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.रायगड नगरी । पनवेल

कोरोना वैश्विक संकटात रक्ताचा मोठ्या तुटवडा जाणवत आहे. नॉन कोविड रुग्णांना मोठ्या प्रमाणात गरज असल्याने सामाजिक बांधिलकीतून दिशा सामाजिक मंच आणि झेंडा सामाजिक संस्था यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात पार पडलेल्या शिबिराला रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्याचबरोबर प्लाझ्मा दान शिबिरही पार पडले.

मार्च महिन्यापासून कोरोना या आजाराने थैमान घातले आहे. यासाठी टाळेबंद सुद्धा घेण्यात आला. महाविद्यालयांना सुट्टी असल्याने रक्तदान शिबिरे आयोजित करता आले नाहीत. त्याचबरोबर कोरोनाविषाणूचे संक्रमण होऊ नये यामुळे सार्वजनिक कार्यक्रमांना परवानगी देण्यात येत नाही. परिणामी वाढदिवस आणि इतर कार्यक्रम साजरे झाले नाहीत. यामुळे रक्तदान शिबिर आयोजित करता आले नाहीत. या पार्श्वभूमीवर रक्तपेढ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा भासू लागला आहे. नॉन कोविड रुग्णांना रक्ताची गरज भासत आहे. रुग्णांवर विविध शस्त्रक्रिया करण्यासाठीही रक्त आवश्यक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शासनाच्या गाईडलाईन प्रमाणे काही सामाजिक संस्था रक्तदानासाठी पुढाकार घेत आहे. कामोठे येथील दिशा महिला मंच आणि झेंडा सामाजिक संस्था यांच्यावतीने ११ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर कोरोना रुग्णांसाठी या आजारातून बर्या झालेल्यांकडून प्लाझ्मा दान करण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती. एमजीएम ब्लड बँक कामोठे यांच्या सहकार्याने हे शिबीर पार पडले.

यावेळी दिशा व्यासपीठाच्या संस्थापक निलम आंधळे ,झेंडा सामाजिक संस्थेचे संस्थापक अशोक राघो पावणेकर , अध्यक्ष जय पावणेकर तसेच रक्तपेढीचे अधिकारी राजेश अत्तरडे यांच्या उपस्थितीत हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. उपक्रमामध्ये दिशा च्या हिरकणी विद्या मोहिते, रेखा ठाकूर, उषा डुकरे, अपर्णा कांबळे, ख़ुशी सावर्डेकर, ललिता इन्कर, मोहिनी पुजारी, दिपाली खरात तसेच प्रथमेश कानागल, अमोल कड, राकेश बारस्कर, अमित गुटुकडे, तुषार हिरवे मिलिंद पाटील, अरुण पावणेकर, प्रशांत कुंभार, राज पावणेकर, जगदीश पावणेकर , विशाल पावणेकर झेंडा सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. रक्तदात्यांना प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचे आभार मानण्यात आले.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे पाली बुद्रुक येथील गट नं. ९३, क्षेत्र- ० हे-५१ आर-६० प्रती (पोटखराब्यासहित) ही मिळकत माझे अशिल श्री. निखिल रसिकलाल माखेचा यांच्या संपुर्ण व एकमेव मालकीहक्क, अधिकार व कब्जेबहिवाटीतील मिळकत आहे (यापुढे वर नमुद मिळकतीस 'सदर मिळकत' संबोधण्यात येत आहे.)

सदर मिळकतीबाबत श्री निखिल रसिकलाल माखेचा आणि श्री. हरिभाऊ पांडुरंग भोईर व इतर यांच्यामध्ये महसुल न्यायालयात वाद चालु आहे. सदर मिळकतीसंदर्भात माझे अशिलांनी मा. महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, मुंबई यांचे न्यायालयात रिव्हिजन अर्ज क्र. L-१७४/२०२० दाखल केला आहे. सदर प्रकरणात मा. महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, मुंबई यांनी श्री. हरिभाऊ पांडुरंग भोईर व इतर यांस मे. तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, पनवेल यांनी पारित केळेळे ३२ ग आदेश व मा. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी पारित केलेले आदेशांस अनुसरुन सदर मिळकतीमध्ये कोणतेही तिऱ्हाईत इसमांचे हक्क, हितसंबंध निर्माण करू नये असा आदेश पारित केला आहे.

तरी तमाम जनतेस सावधान केले जाते की, वर नमुद मिळकतीबाबत माझे अशिलांनी रिव्हीजन अर्ज दाखल केलेला असुन सदर रिव्हीजन अर्ज आजतागयात प्रलंबित आहे. त्यामुळे सदर मिळकतीबाबत माझ्या अशिलांच्या संमतीशिवाय श्री. हरिभाऊ पांडुरंग भोईर व इतर अथवा त्यांनी अधिकृत केलेल्या कोणाही इसमासमवेत एजंट व अन्य कोणाही व्यक्तीबरोबर खरेदी- विक्री, हस्तांतराण, तारण, गहाण व बक्षीस अदलाबदल किंवा तत्सम अन्य कोणत्याही प्रकारच्या करार-मदार अथवा व्यवहार करु नये, असा कोणताही करार-मदार अथवा व्यवहार केल्यास सदर व्यवहार हा बेकायदेशीर व अवैध असा राहील व सदरचा व्यवहार हा माझे अशिलांवर बंधनकारक असणार नाही वब सदर व्यवहार हा मा. महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशाची अवहेलना करणारा ठरेल, असे झाल्यास माझे अशिल अशा सर्व इसमांविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

ठिकाण: ठाणे
दिनांक: /१०/२०२०

सही /-
(स्मिता म्हात्रे)
वकिल
१४७, द्वारकादास रतनशी मेन्शन, कलेक्टर ऑफिस जवळ, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०१.

सही/-
श्री. निखिल रसिकलाल माखेचा

रायगडात ओला दुष्काळ जाहीर करण्याची जिव्हाळा फाऊंडेशनची मागणी

उरणच्या तहसिलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

दै.रायगड नगरी । उरण

रायगड जिल्ह्यात परतीच्या पावसाने भातशेतीचे अतोनात नुकसान झालं आहे. निसर्गाने केलेल्या अवकृपेने शेतकरी कोलमडून गेला आहे. त्यामुळे जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जिव्हाळा फाऊंडेशन महाराष्ट्रने राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केली आहे. जिव्हाळा फाऊंडेशन महाराष्ट्रचे अध्यक्ष रुपेश पाटील, कार्याध्यक्ष पंकज ठाकूर यांनी तशा प्रकारचे निवेदन उरणच्या तहसिल दारांमार्फत मुख्यमंत्र्यांना दिले आहे. सदर निवेदन उरणचे निवासी नायब तहसिलदार संदीप खोमणे यांच्याकडे सादर केले आहे.

जिल्ह्यात परतीच्या पावसाने भातशेतीचे प्रचंड नुकसान झालं आहे. हाताशी आलेलं भातपिकाची वाताहात झालेली पाहून शेतकरी निराश झाला आहे. एकतर भातशेतीतून अपेक्षित उत्पन्न निघत नाही. जवळपास तोट्याची शेती होत असताना शेतीवर जीवापाड प्रेम करणारा शेतकरी आपली जमीन ओसाड न ठेवता कसत असतो. त्यासाठी प्रचंड मेहनत करत आर्थिक भार सोसत प्रसंगी उसनवारी करत शेती करत असतो. अशात निसर्गाने अवकृपा करून भातशेतीची नासाडी केल्यावर करायचं काय असा प्रश्न त्याच्यासमोर उभा ठाकतो. शासनाने या भातशेतीचे पंचनामे करण्याचे यापूर्वीच आदेश दिले होते. त्यासाठी १५ ऑक्टोबर पर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत दिली होती. पावसापाण्यात उरलं सुरलं शेत आवरताना अर्ज दाखल करण्याबाबत पुरेशी माहिती नसणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न होणे या कारणास्तव अनेक शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केलेले नाहीत. जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा या मागणीबरोबर शेतकऱ्यांचे नुकसान होऊन नये म्हणून, अर्ज दाखल करण्याची मुदत वाढवून द्यावी अशीही मागणी जिव्हाळा फाऊंडेशनचे अध्यक्ष रूपेश पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.

अलिबागची लाडकी लहान गिर्यारोहक शर्विका म्हात्रेचा चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सत्कार

दै.रायगड नगरी । अलिबाग

इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड कडून भारतातील सर्वात लहान गिर्यारोहक म्हणून नोंद असलेली अलिबाग तालुक्यातील लोणारे थळ येथील कु. शर्विका जितेन म्हात्रे, हि वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला 'साल्हेर' सर केलेली महाराष्ट्रातील ती पहिली लहान कन्या ठरली आहे. या विक्रमाची नोंद दुसऱ्यांदा आशिया आणि इंडिया बुक मध्ये होणार आहे. शेकाप महिला आघाडी प्रमुख, नगरसेविका चित्रलेखा पाटील यांनी शर्विका म्हात्रे हिच्या निवासस्थानी जाऊन मानपत्र, पुष्पगुच्छ देवून सन्मान केला.

या प्रसंगी शर्विका म्हात्रे हिचे वडील जितेन म्हात्रे, शर्विकाची आई, आजोबा, आस्वाद घरत, सतिष म्हात्रे, योगेश म्हात्रे, तुषार पाटील, प्रितेश पाटील आदि उपस्थित होते. खेळण्या बागडण्याच्या वयात तिच्या कडून एका मागून एक १३ गडकिल्ले सर केले गेले. याची नोंद घेवून अलिबागची लाडकी कन्या हिला आशिया बुक ऑफ रेकॉर्ड कडून ग्रँड मास्टर किताब, मनुष्यबळ विकास अकादमी तर्फे आदर्श बाल गौरव क्रीडा रत्न पुरस्कार, मावळा सन्मान असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तिने हा विक्रम कोरोना योध्याना समर्पित केला असल्याचे शर्विकाचे वडील जितेन म्हात्रे यांनी संगितले, शर्विकाने या विक्रमाच्या माध्यमातून कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर देशातील तमाम डॉक्टर, पत्रकार, पोलिस, सफाई कामगार आणि इतर क्षेत्रातील सर्व कोरोना योध्याना मानवंदना दिली.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

पृष्ठ क्र.१ वरुन...

कोकणातील विविध प्रश्न जलदगतीने सोडवावेत

राऊत, खासदार राजेंद्र गावीत, आमदार सर्वश्री दिपक केसरकर, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, राजन साळवी, वैभव नाईक, दौलत दरोडा, श्रीमती गीता जैन, शेखर निकम, रवींद्र पाठक, श्रीनिवास वनगा, शांताराम मोरे, योगेश कदम, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, विभागीय आयुक्त आण्णासाहेब मिसाळ, ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, पालघर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कार्यकारी अभियंते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व खासदार, आमदार यांनी त्या त्या भागातील विविध प्रश्न मांडले. नवीन स्थापन झालेल्या पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतील रिक्त पदे भरण्याबाबत चर्चा झाली. याबाबत तपासून कार्यवाही करावी, अशा सूचना राज्यमंत्र्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्या. कोकणातील खारभूमीला निधी मिळण्याबाबत यावेळी चर्चा झाली. या कामासाठी किमान ३०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे. यासाठी पुरसा निधी मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करु, असे राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार यांनी सांगितले. वादळ आणि अतिवृष्टीमुळे कोकणातील अनेक ग्रामीण रस्ते नादुरुस्त झाले आहेत. हे सर्व रस्ते दुरुस्त करुन कोकणातील ग्रामीण भागातील दळणवळण सुरळीत करणे आवश्यक आहे. याबाबत एक सविस्तर आणि वेगळा प्रस्ताव तयार करुन त्याला वित्त मंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडे सादर करु, असे त्यांनी सांगितले. कोकण ग्रामीण पर्यटन योजनेसही पुरेसा निधी देऊन कोकणात ही योजना प्रभावीपणे राबविली जाईल, असे ते म्हणाले. कोकणातील पंचायत समित्या, तहसील कार्यालये यांच्या इमारतींच्या प्रश्नाबाबतही यावेळी चर्चा झाली. जनतेचा दररोज संपर्क येणारी ही कार्यालये असून शासनाच्या बहुतांश योजनांची अंमलबजावणी येथूनच होते. त्यामुळे कोकणात आवश्यकतेनुसार पंचायत समित्या तसेच तहसील कार्यालयांची आवश्यक दुरुस्ती किंवा नवीन इमारती देण्याबाबत प्रस्ताव द्यावेत, त्यावर कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कुमारी अदिती तटकरे यावेळी म्हणाल्या की, कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाने बीच शॅक धोरण आणले आहे. यामुळे स्थानिकांना मोठा रोजगार प्राप्त होणार आहे. याशिवाय कृषी पर्यटन, इको टुरिजम अशा विविध योजना शासन आणत आहे. पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देण्याचेही विचाराधीन आहे. इज ऑफ डुइंग बिझनेसअंतर्गत आदरातिथ्य क्षेत्रासाठी असलेल्या परवान्यांची संख्या कमी करण्यात आली आहे. याशिवाय कोकणाच्या विकासासाठी राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत, असे त्यांनी सांगितले. ग्रामविकास, महसूल, खारजमिन आणि बंदरे विभागाच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील विविध प्रश्न त्यांनी यावेळी मांडले.

कोकणातील रिक्त पदांचा प्रश्न, सिंधुदुर्गातील उपजिल्हा रुग्णालयांचा प्रश्न, कुळवाटीधारकांचे प्रश्न, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, नद्यांमधील गाळ काढणे, विविध घरकुल योजना, वनहक्काची प्रकरणे, प्रधानमंत्री मत्यसंपदा योजना, सागर किनाऱ्यावरिल मच्छिमारांच्या घरांचे सीमांकन करणे, वाढवण बंदराचा प्रश्न अशा विविध विषयांच्या अनुषंगाने यावेळी चर्चा झाली.

२४ तासात नेरळ पोलिसांनी केले जेरबंद

कडील तपास पथक तयार करून तपास पथकास योग्य त्या सूचना दिल्या.तपास पथकाने गोपनीय माहिती काढुन गुन्ह्यातील आरोपी १) राजेश काळूराम माळी वय-३० वर्षे, रा.खाड्याचा पाडा, ता.कर्जत २) सुनील तुकाराम खाडे वय-४१ वर्षे, रा.खाड्याचा पाडा, ता.कर्जत ३) समीर मंगल पेमारे वय-२८ वर्षे, रा.खाड्याचा पाडा, ता.कर्जत ४) श्रीधर चंदर दिघे वय-५० वर्षे, रा.पाषाणे ता.कर्जत ५) प्रमोद दिलीप दिघे वय-२२ वर्षे, रा.खाड्याचा पाडा, ता.कर्जत यांना दिनांक १०/१०/२०२० रोजी अटक करण्यात आलेलीअसुन त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून अधिक तपास सहा.पोलीस निरीक्षक श्री.अविनाश पाटील हे करीत आहेत. सदरची कारवाई हीमा.श्री.अशोकदुधे, पोलीस अधिक्षक सो. रायगडअलिबाग, मा.श्री.सचिन गुंजाळ, अपर पोलीस अधिक्षक सो.रायगड-अलिबाग व मा.श्री.अनिल घेरडीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सो.कर्जत विभाग यांचेमार्गदर्शनानुसार श्री.अविनाश पाटील सहा. पोलीस निरिक्षक नेरळ पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली नेरळ पोलीस ठाणेकडीलसफौ/ गणेश गिरी, पोह्वा/१२५३ अविनाश वाघमारे, पोना/१३७८ निलेश वाणी, पोना/१५५५ शरद फरांदे यांचे पथकाने पार पाडली.

अखिल भारतीय किसान सभेचा एल्गार

सिडकोने एकूण जमिनीचे सर्व अवार्ड जाहीर न करता टप्याटप्याने केलेया नंतर काही प्रकल्पग्रस्तांनी भूसंपादन कायदा कलम १८ प्रमाणे कोर्ट रेफरन्स सहउपजिल्हाधिकारी(विशेष भुसंपादन अधिकारी) यांच्याकडे वाढीव नुकसान भरपाईसाठी अर्ज केले. परंतु वाढीव नूसान भरपाईची रक्कम अल्प असल्याने प्रकल्पग्रस्तांनी पनवेल व अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर यांच्याकडे वाढीव नुकसान भरपाईसाठी अर्ज सादर केले. न्यायालयाने निकाल देऊन सुद्धा नुकसान भरपाईची रक्कम शासन व सिडकोच्या आडमुठे धोरणामुळे प्रकल्पग्रस्तांना वेळेवर मिळत नाही. याकडे लक्ष वेधण्यासाठी या आंदोलनाचे उद्दिष्ट आहे.

५० वर्षा पूर्वी सुमारे ४ कोटीच्या भांडवलावर सिडकोने आपल्या कामकाजाचा शुभारंभ केला. ५० वर्षा नंतर आज सिडकोच्या तिजोरीत ९ हजार ५०० कोटी रुपये ठेवी स्वरुपात पडून आहेत. या निधीवर राज्य शासनाचा डोळा आहे. मात्र ९ हजर ५०० कोटी मधील ३ हजार कोटी रुपये राज्य शासनाला प्रकल्पग्रस्तांना न्यायालयाने कायदेशीर देणे असलेल्या रक्कमा न देता हा निधी अन्य ठिकाणी वापरण्यासाठी हवा आहे. याचा प्रत्यय चार महिन्या पूर्वी राज्य शासनाने मुंबईला मुंबईकरांसाठी कोविडरुग्णालय उभारणीचे आदेश दिले या आदेशानुसार सिडकोने मुंबई, मुलुंड परिसरात लार्सन ॲण्ड ट्युब्रो कंपनीच्या मोकळ्या शेडमध्ये २० कोटी रुपये खर्च करून प्रकल्पग्रस्थांच्या तोंडाला पाने पुसित हे रुग्णालय कार्यान्वित केले आहे.

या पाठोपाठ ठाणे येथे ही एक कोविड रुग्णालय उभारण्यात आले,सांगितले जाते, तर याच फंडा मधून आमदार मंदा म्हात्रे यांनी १० कोटी रुपये खर्च करून महाराष्ट्र भवन उभारावे अशी मागणी सिडकोचे संचालक संजय मुखर्जी यांच्या बरोबर आठवड्या पूर्वीसिडको सोबत झालेल्या बैठकीत केली. आहे एकीकडे सिडको कडे ९ हजार ५०० कोटीची शिल्लक सिडको कडे असताना ज्या प्रकल्पग्रस्थांच्या शेत जमिनी अल्प मोबदल्यात घेऊन त्यांच्या जमिनीवर मिळविलेल्या नफ्यातून त्यांनाच कायदेशीर वाढीव मोबदला देण्यासाठी सिडको कडे पैसानाहीतर दुसरी कडे शासन याचा उपयोग प्रकल्पग्रस्थाना डावलून करीत आहे, या पेक्षा प्रकल्पग्रस्थांचे दुर्देव ते कोणते? म्हणूनच किसान सभेच्या वतीने १९ ऑक्टोबर रोजी सिडको द्रोणागिरी व विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या कार्यालयावर या कडे लक्ष वेधण्यासाठी इशारा वजा एक दिवसाचे आंदोलन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे यांनी दिली आहे.

वाड्यांचे महसूली गावांमध्ये रूपांतर करा

राज्यमंत्री तसेच पालकमंत्री, रायगड कार्यालयास सादर करावा आणि जिल्ह्यातील दौऱ्यादरम्यानही याबाबत अवगत करावे, असे निर्देश जिल्हा प्रशासनास दिले आहेत.

अतिक्रमण विरोधी पथकाला शिवसेनेने पिटाळले

महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाला विरोध केला.

या वेळी शिवसेना खांदा वसाहत शहर प्रमुख सदानंद शिर्के, खांदा कॉलनी शिवसेना विभाग प्रमुख जयंत भगत उपशहरप्रमुख दत्तात्रय महामूलकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या वेळी स्थिती सूरळीत होत नाही तोपर्यंत फूटपाथवरील गोरगरीबांनवर कारवाई करु नका अशी विनंती शिवसेना पदाधिकार्यांनी महापालिकेच्या अधिकार्यांना केली ही विनंती त्यांनी मान्य केली परंतु रस्त्यावर येणार्या अनाधिकृत हातगाड्यांवर कारवाई केली जाईल असे स्पष्ट केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

उरणमध्ये१९ पॉझिटीव्ह

दै.रायगड नगरी । उरण

आज उरणमध्ये कोरोना पॉझिटीव्ह १९ जण सापडले आहेत. आज उपचार करून १५ जणांना घरी सोडण्यात आले आहे. आज कोणीही मयत नाही. उरणमध्ये कोरोना पॉझिटीव्हचा आकडा दोन हजारच्या पुढे गेला आहे.

आज एकूण पॉझिटीव्ह २००६, उपचार करून बरे झालेले १७९८, उपचार घेणारे १०६, मयत १०२ असल्याची माहिती तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली. आज काळाधोंडा उरण १, द्रोणागिरी २, म्हात्रे वाडी १, नेव्हल स्टेशन करंजा २, विनायक कुंभारवाडा १, परिचय सोसायटी सातराठी ८, डाऊर नगर १, आवरे १, नागाव १, कोप्रोली १ असे एकूण १९ जण पॉझिटीव्ह आढळले आहेत. तर म्हात्रेवाडी ३, सातराठी १, नागाव ५, उरण २, सारडे १, गोवठणे १, द्रोणागिरी कविमल १, कामगार वसाहत १ असे एकूण १५ जणांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. उरणमध्ये आज कोरोना पॉझिटीव्हचा आकडा जरा जास्त आलेला आहे. तर उपचार करून घरी सोडण्यात आलेला आकडाही जास्त आहे. तसेच कोणीही मयत नाही. त्यामुळे उरणकरांनी आणखीन सावधानता बाळगली तर नक्कीच कोरोनाचा प्रादुर्भाव आणखीन कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रुग्णालयातून कोरोनाबाधीत रुग्णाचे पलायन

दै.रायगड नगरी । पनवेल

एमजीएम रुग्णालयातून कोरोनाबाधीत रुग्णाने पलायन केल्याची घटना घडली असून सदर रुग्णाचा शोध कामोठे पोलीस करीत आहेत.

कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटल येथील कोव्हिड वॉर्डात दाखल असलेला कोरोनाबाधीत रुग्ण राम मुरत (३५) हा कोणास काही एक न सांगता संधी साधून रुग्णालयातून पसार झाला आहे. या संदर्भात रुग्णालय परिसरात शोध घेवूनही तो सापडला नाही. त्याचप्रमाणे नातेवाईकांशी संपर्क साधला असता तेथे तो आढळून न आल्याने एमजीएम रुग्णालयातील डॉक्टरांनी तो पळून गेल्यासंदर्भात कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. कामोठे पोलिसांनी त्याच्यावर साथ रोग अधिनियमानुसार गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

गोवे ग्रामपंचायतीत बचत गटाच्या महिलांना मास्कचे वाटप

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

दि.१५ ऑक्टोबर २०२० रोजी विधान परिषदेचे तरुण,तडफदार व लोकप्रिय आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन गोवे ग्रामपंचायती तर्फे मास्कचे वाटप करण्यात आले.

कोरोना विषाणूच्या महामारीमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी सद्यस्थितीत मास्क लावाणे हिताचे असुन या मास्कचे वाटप शांत,संयमी,मनमिळावू आणि आपल्या कार्यपद्धतीने विरोधकांना आपलेसे करणारे कोरोना संकट काळात जनतेच्या पाठीशी खंबीर पणे उभा राहणारा तरुण युद्धा आ.अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधुन गोवे ग्रामपंचायती तर्फे गोवे गावातील सर्व बचत गटाच्या महिलांना मास्कचे वाटप करण्यात आले.यावेळी गोवे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया संदीप जाधव, ग्रामपंचायत सदस्या रंजिता जाधव व असंख्य महिला उपस्थित होत्या.

जिल्ह्यातील प्रलंबित महत्त्वाचे विषय तात्काळ मार्गी लावावेत : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

रायगड जिल्ह्यामध्ये सर्वांगीण विकासासाठी विविध विभागांमार्फत विविध उपक्रम, योजना व उपाययोजना हाती घेण्यात आले आहेत. त्यासाठी सर्व विभागांनी तयार केलेल्या प्रस्तावास कालबद्ध कालावधीमध्ये शासनाची मान्यता घेणे व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

या बाबीचा सर्वंकष विचार करुन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्हास्तरीय विभागप्रमुखांनी शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या महत्त्वाच्या विषयांची यादी तयार करावी, जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व जिल्हास्तरीय विभागप्रमुखांची बैठक घेऊन विभागनिहाय शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या महत्त्वाच्या विषयांची यादी संबंधित विभागप्रमुखांकडून दरमहा प्राप्त करून घ्यावी, त्याची प्रत राज्यमंत्री तथा पालकमंत्री, रायगड यांच्या कार्यालयात सादर करावी, शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावाच्या मान्यतेसाठी आवश्यक माहिती सादर करणे व त्याच्या समन्वयासाठी विभागप्रमुखांनी दर पंधरवड्यामध्ये सोमवारी राज्यमंत्री तथा पालकमंत्री, रायगड या कार्यालयाशी समन्वय ठेवून प्रस्तावांची सद्य:स्थिती व आवश्यक कार्यवाहीबाबत अवगत करावे, त्याचप्रमाणे जिल्ह्यातील दौऱ्यादरम्यानही याबाबत वेळोवेळी अवगत करावे, जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागप्रमुखांसाठी तसे परिपत्रक निर्गमित करावे, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

शिहू नागोठणे पोयनाड खड्डेमय मार्गावर आता मोकाट गुरांचाही ठिय्या

जिवघेण्या अपघाती घटनांना निमंत्रण, वाहनचालकांची होतेय कसरत

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

शिहू नागोठणे पोयनाड खडतर मार्ग समस्यांच्या विळख्यात सापडला आहे. खडतर व दगडगोटे असलेला धोकादायक रस्ता त्यात रस्त्यावर ठिय्या मांडून बसणारी व रास्ता रोको करणारी मोकाट गुरे प्रवाशी, वाहनचालक व नागरिकांसमोर डोकेदुखी ठरत आहे. हा मार्ग वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. या मार्गावरुन सातत्याने वाहनांची वर्दळ सुरु असते. रस्त्यातील जिवघेण्या खड्ड्यांमुळे हा मार्ग नेहमीच चर्चेत राहिला आहे. अशातच या मार्गावर मोकाट गुरांचा सातत्याने जनू रास्ता रोको होत असल्याने वाहनचालकांसह प्रवाशी अक्षरशः हैराण झाले आहेत.

मोकाट गुरांचे जथ्थे दिवसा व रात्री या मार्गाच्या मधोमध ठाण मांडत असल्याने जिवघेण्या अपघाती घटनांना निमंत्रण मिळत आहे. या मार्गावर रस्त्यात बसलेल्या गुरांना धडकून अनेकदा अपघाती घटना घडल्या आहेत. त्यामुळे गुरे मालकांनी आपापली गुरे मोकळी न सोडता त्यांची योग्यप्रकारे निगा राखावी अशी मागणी प्रवाशी व वाहनचालकांमधून जोर धरत आहे. शिहू नागोठणे परिसरात मोकाट गुरांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या मार्गावरील मोकाट गुरांची वाढती समस्या डोकेदुखी ठरत आहे. भररस्त्यात ही गुरे ठाण मांडून बसत असल्याने वाहतुक कोंडीची समस्या देखिल निर्माण होताना दिसत आहे. तर रात्रीच्या वेळी मोटारसायकलस्वार व वाहनचालकांना रस्त्यात बसलेली गुरे दिसत नसल्याने अनेकदा अपघाती घटना घडल्या आहेत. तसेच अवजड वाहनांच्या धडकेत गुरांचा बळी जाण्याची देखिल शक्यता असते. अशातच वाहनचालकांनी कितीही हॉर्न वाजविला तरी मोकाट गुरे जागची हालत नसल्याने यातून वाट कशी काढायची असा प्रश्न वाहनचालकांसमोर उभा राहत आहे. मोकाट गुरांचे मालक व शेतकरी गुरांचा वापर करून काम झाल्यावर बेफिफिकरपणे वागत आहे.

रायगड जिल्ह्यातील मुंबई गोवा महामार्ग, पाली खोपोली महामार्ग, खोपोली पेण अलिबाग मार्ग, शिहू नागोठणे पोयनाड तसेच वाकण पाली खोपोली मार्गावर मोकाट गुरांची समस्या गंभीर झाली आहे. सदर मार्ग प्रवास व वाहतुकीच्या दृष्टीने सुरक्षित असावा याकरीता मालकांनी आपली गुरे मोकाट सोडू नयेत. याबरोबरच शास-नप्रशासनाने देखिल रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी जनमाणसातून जोर धरत आहे.

अंतिम मुदत नमूद करणे हॉटेल अथवा मिठाई विक्रेत्यांना बंधनकारक : लक्ष्मण अं.दराडे

दै.रायगड नगरी । अलिबाग

हॉटेल अथवा मिठाई विक्रेत्यांना दि. १ ऑक्टोबर २० पासून ते खुल्या स्वरूपात विक्री करीत असलेल्या मिठाई पेढा, जिलेबी, लाडू इत्यादी अन्न पदार्थ खरेदी केल्यापासून किती दिवसाच्या आत वापरावे, म्हणजेच मिठाई खाण्यास योग्य असल्याची अंतिम मुदत नमूद करणे, हे ठळकपणे नमूद करणे बंधनकारक असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) लक्ष्मण अं.दराडे यांनी स्पष्ट केले आहे.

बऱ्याच दुकानातून छोट्या कागदी बॉक्स मधून मिठाईची विक्री केली जाते. मात्र ही मिठाई कधीपर्यंत खाणे योग्य आहे, याचा उल्लेख नसतो. हॉटेल अथवा मिठाई विक्रेत्यांकडून विक्री केले जाणारे गोड पदार्थ किती दिवसांपर्यंत खाणे योग्य राहू शकतात, हे ग्राहकांना न समजल्यामुळे बऱ्याच वेळा ग्राहकांकडून मिठाईचे सेवन केल्याने ग्राहकांच्या आरोग्यास अपाय होऊन अन्न विषबाधेसारखी अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी अन्नस-ुरक्षा व मानके प्रधिकरण नवी दिल्ली यांनी दि.२५ जून २०२० रोजी आदेश निर्गमित केले असून हे आदेश दि. १ ऑक्टोबर २०२० पासून अंमलात आले आहेत. यापुढे मिठाई किती दिवसांपर्यंत खाण्यास योग्य आहे, हे सर्व मिठाई विक्रेत्यांना जाहीर करावे लागणार आहे. त्याचप्रमाणे ही मिठाई कधी तयार केली आहे, हे सुद्धा दुकानदार त्यांच्या दुकानात प्रदर्शित करू शकतात.

या बाबींचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व मिठाई विक्रेत्यांनी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन रायगड-पेण लक्ष्मण अं.दराडे यांनी केले आहे.

दुकानाचे शटर उचकटून साड्या केल्या लंपास

दै.रायगड नगरी । पनवेल

एका बंद दुकानाचे शटर उचकटून आतील दुकानात असलेल्या साड्या व मोबाईल फोन लंपास कल्याची घटना करंजाडे वसाहतीत घडली आहे. करंजाडे आर/३ येथे प्रेमा भोईर यांचे श्री लक्ष्मी नारायण कलेक्शन व ब्युटी पार्लर असे दुकान असून सदर दुकान बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला व दुकानातील महागड्या साड्या व मोबाईल फोन असा मिळून हजारो रूपयांचा ऐवज लंपास केला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

कोकण विभागात सरासरी १२.६ मि.मी. पावसाची नोंद

दै.रायगड नगरी । मुंबई

कोकण विभागात दि.१६ ऑक्टोबर २०२० रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत सरासरी १२.६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३०.२ मि.मी. झाली आहे. कोंकण विभागातील ठाणे-१.२ मि.मी.,पालघर-२.२ मि.मी.,रायगड-३.२ मि.मी., रत्नागिरी-२०.८ मि.मी., सिंधुदुर्ग-३०.२ मि.मी. असा पाऊस झाला. आतापर्यंत विभागात एकूण सरासरी १५६.४ इतका पाऊस झाला आहे.

राव साहेब
अर्जदार तर्फे वकील : ॲड.एस.व्ही.क्षिरसागर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२८१/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२८/१०/२०२०

१) श्री.संदीप सुरेश अवर्सेकर (मुलगा)
वय : ५६ वर्षे, धंदा : नोकरी/व्यवसाय
रा.बी.८०६, पॅराडाईस बिल्डींग, रहेजा विहार, चांदिवली रोड,
चांदिवली, पवई, अंधेरी (ईस्ट), मुंबई-४०००७२
२) श्री.प्रदीप सुरेश अवर्सेकर (मुलगा)
वय :५४ वर्षे, धंदा : नोकरी/व्यवसाय
रा.डी/५७, पांडुरंग सी.एच.एस., ए.बी.नायर रोड,
जुहू पोस्ट ऑफिस जवळ, जूहू मुंबई-४०००४९
३) सौ.स्मिता संजय टिपणीस
(पूर्वाश्रमीचे नांव स्मिता सुरेश अवर्सेकर) (मुलगी)
वय : ५२ वर्षे, धंदा : नोकरी/व्यवसाय
रा.५-७१, मिरा सोसायटी, पुणे सिटी, मार्केट यार्ड,
पुणे-४११०३७ अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आहे की, ज्याअर्थी कै.अंजली सुरेश अवर्सेकर या रा.डी/५७, पांडुरंग सी.एच.एस., ए.बी.नायर रोड, जुहू पोस्ट ऑफिस जवळ, जुहू, मुंबई ४०००४९ येथे राहत्या होत्या. त्या दिनांक ०६/०५/२०१५ रोजी जुहू मुंबई येथे मयत झालेल्या होत्या. त्याअर्थी अर्जदार यांनी श्री.संदीप सुरेश अवर्सेकर व इतर २ यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.अंजली सुरेश अवर्सेकर यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे
वेअरहौसिंग प्लॉट नं.४१२, रोड नं.३, तळमजला, सेक्टर-के. डब्ल्यू.सी., कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८, क्षेत्र ४५०.०० चौ.मी.

वरील अर्जदार हे मयत कै.अंजली सुरेश अवर्सेकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.अंजली सुरेश अवर्सेकर यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करील याची दखल घ्यी.

आज दि.१६/१०/२०२० रोजी माझ्या सही, न्याायलयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

राव साहेब
अर्जदारातर्फे वकील
श्री.निवृत्ती बा.पावशे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२०५/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.०४/११/२०२०

१) ललिथा अगस्ठीअन पडयाची
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) पुष्पलक्ष्मी अगस्ठीअन वान्नियार उर्फ पड्याची
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
३) महालक्ष्मी अगस्ठीअन पड्याची
वय : २१ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.ए-२०४, दुसरा मजला, श्री गुरुकृपा अशिष,
प्लॉट नं.१०३, सेक्टर १७, मोठा खांदा, जवळ,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प)
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.अगस्ठीअन टी. हे दिनांक ८/३/२०११ रोजी अपोलो हॉस्पिटल, मदुराई तामिळनाडू येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.अगस्ठीअन टी.यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.अगस्ठीअन टी.यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे मिळकतींचे वर्णन

सदनिका क्र.२०४, दुसरा मजला, ए-विंग, गुरुकृपा अशिष, प्लॉट क्रं.१०३, सेक्टर १७, मोठा खांदा, जवळ, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६. (क्षेत्र ३७.७३४ चौ.मी. कारपेट + ४.०५० चौ.मी.टेरेस)

वरील अर्जदार हे मयत कै.अगस्ठीअन टी.यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.अगस्ठीअन टी.यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१६/१०/२०२० रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.भाकरे सो.कोर्टात
ॲड.संतोष पाडळकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४४५/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२७/११/२०२०

कै.मंजुला वृजलाल सादराणी (मयत) वारस
१) अमिता वृजलाल सादराणी
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.ए-८, दुसरा मजला, त्रिमुर्ती सहनिवास,
शिवाजी रोड, विरुपाक्ष मंदिराजवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
२) वैशाली परेश रुपारेलिया
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.२०३, प्लॉट नं.४७, सेक्टर नं.२,
शांतीदूत को.ऑ.हौसिंग सोसायटी,
सेंट मेरी शाळेजवळ, चारकोप,
कांदिवली (प.), मुंबई-४०००६७
३) फाल्गुनी उमेश कोटेचा
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ए.१०१, शिवालय, अपार्टमेंट, अयप्पा मंदिराजवळ,
पी-पी क्रॉस मार्ग, विराट नगर, जि.ठाणे,
विरार (प.) ४०१३०३ अर्जदार

विरुद्ध

कुणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, कै.मंजुळा वृजलाल सादराणी यांचे दि.१२/०३/२०१९ रोजी त्यांचे राहते घरी नैसर्गिक निधन झालेले आहे. सदर अर्जाचे कामी अर्जदारांनी कै.मंजुला वृजलाल सादराणी यांच्या मृत्यू दाखल्याची मुळ प्रत दाखल केलेली आहे. प्रस्तुत अर्जातील अर्जदार नं.१ ते ३ ह्या कै.मंजुला वृजलाल सादराणी यांच्या मुली आहेत. कै.मंजुला वृजलाल सादराणी यांच्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

फ्लॅट मिळकतीचे वर्णन
मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
फ्लॅट नं.ए-८, क्षेत्र ७२० चौ.फूट, त्रिमुर्ती सहनिवास, दुसरा मजला, शिवाजी रोड, विरुपाक्ष मंदिराजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

वर वर्णन केलेली फ्लॅट मिळकत कै.मंजुला वृजलाल सादराणी यांनी दि.०१/०३/१९९६ रोजी मे.दुय्यम निबंधक सो.पनवेल यांचे कार्यालयाकडील नोंदणीकृत दस्त क्र.९७९/१९९६ अन्वये नोंदणीकृत ॲग्रीमेंट फॉर सेल दस्ताने उक्त रक्कम रु.१,५८,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख अठ्ठावन्न हजार मात्र) अदा करून खरेदी केलेली आहे. सदर दस्ताची व्हेरीफाईड प्रत प्रस्तुतचे अर्जाचे कामी अर्जदारांनी मे.कोर्टाकडे दाखल केलेली आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे वर्णन परिशिष्टामधील मिळकत कै.मंजुला वृजलाल सादराणी यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. कै.मंजुला वृजलाल सादराणी यांच्या निधनापश्चात त्यांच्या वारसांच्या नावे सदरहू मिळकत करण्याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून अर्जदार हेच कै.मंजुला वृजलाल सादराणी यांचे वारस असलेबाबत मे.कोर्टाकडील वारसदाखला आणणेकरिता तोंडी सांगण्यात आलेले आहे. सबब, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मे.कोर्टाकडे केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.२७/११/२०२० रोजी सकाळी १०.३० वा. कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्टाकडून अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांना कै.मंजुला वृजलाल सादराणी यांचे वारसनोंद दाखला देण्याकामी आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१६/१०/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.संदीप पांडे
अर्जदार यांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.२३५/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.३०/११/२०२०

१) श्रीधरन अमबट मेनन वय : ५१ वर्षे
रा.६१ अश्विनी हाईटस गोखले रोड, धनकवडी
कादिवली वेस्ट मुंबई ४०००६७

वरील अर्जदार श्रीधरन अमबट मेनन यांची बहिण श्रीमती.प्रिता मेनन यांचे निधन दिनांक ०६/०६/२०१८ रोजी ६१ अश्विनी हाईटस गोखले रोड धनकवडी कांदिवली वेस्ट मुंबई ४०००६७ येथे झाले. यांच्या मालकीच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मालमत्तेचे वर्णन

१) फ्लॅट नं.४०१ अभियंता को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड प्लॉट नं.६४, अे.सेक्टर २१ खारघर नवी मुंबई ४१०२१० ता.पनवेल, जि.रायगड

वरील मिळकतीबाबत अर्जदाराचे वारस दाखला मिळण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावा. वरील पद्धतीने कोणती हरकत नसल्यास अर्जदारांच्या विनंतप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६ माहे १० २०२० रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.संदीप पांडे
अर्जदार यांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.११८६/२०१९
नि.नं.७/ड
ने.ता.०७/१२/२०२०

१) श्री.संतोष शांताराम भगत वय : ४० वर्षे
रा.वरचे ओवळे गाव उलवे रोड मराठी,
स्कूल जवळ, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६

वरील अर्जदार संतोष शांताराम भगत यांची आई श्रीमती.मुक्ताबाई शांताराम भगत यांचे निधन दिनांक २४/०८/२०१९ रोजी वरचे ओवळे गाव उलवे रोड मराठी स्कूल जवळ पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ येथे झाले. यांच्या मालकीच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मालमत्तेचे वर्णन

१.१/४ हिस्सा निवासी जागामध्ये प्लॉट नं.११७ पुष्पक वडघर, सेक्टर १, पनवेल रायगड. क्षेत्रफळ ५०० चौ.मीटर

वरील मिळकतीबाबत अर्जदाराचे वारस दाखला मिळण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात दाखल करावा. वरील पद्धतीने कोणती हरकत नसल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६ माहे १० २०२० रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

पायरीचीवाडीतील विद्यार्थ्यांसह पालकांचा दररोज वाचनाचा व हात स्वच्छ धुण्याचा संकल्प

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद पायरीची वाडी शाळेतील विद्यार्थ्यांसह पालकांनी दररोज वाचनाचा व हात स्वच्छ धुण्याचा संकल्प केला आहे. राजीप शाळा पायरीचीवाडी येथे गुरुवारी (ता.१५) अशा अनोख्या पद्धतीने वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात आला.

सध्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे पालक विशेषत: महिला पालक घरीच असतात. जर पालकांनीही दररोज विद्यार्थ्यांसोबत वाचन केले तर विद्यार्थी सुद्धा आपोआपाप आवडीने वाचन करतील. मग 'चला विद्यार्थ्यासंगे वाचूया' ही कल्पना उपक्रमशील शिक्षक कुणाल पवार यांच्या मनात आली. त्याप्रमाणे त्यांनी ही संकल्पना विद्यार्थ्यांसह पालकांना समजावून सांगितली. मग या संकल्पनेला पालकांनाही उत्स्फूर्त प्रतिसाद देत आम्ही आमच्या पाल्याजवळ दररोज बसून एका धड्याचे तसेच अवांतर वाचन करूअसा संकल्प केला.

तसेच यावेळी शिक्षक कुणाल पवार यांनी हात स्वच्छ कसे धुवावे याचे कृतीयुक्त प्रात्यक्षिक यावेळी करून दाखविले. यावेळी विद्यार्थ्यांसह पालकांनी स्वच्छ हात धुण्याचे सहा प्रकार समजावून घेऊन याच पद्धतीने हात स्वच्छ धुण्याचा संकल्प केला.

महिलेशी अश्लिल वर्तन करणाऱ्या इसमाविरूद्ध गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

एका महिलेशी अश्लिल वर्तन करणाऱ्या इसमाविरूद्ध पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील शेडूंग टोलनाक्याजवळ असलेल्या विल्फ्रेड कॉलेजच्या कार्यालयात काम करणाऱ्या एका व्यक्तीची पत्नी डबा घेऊन आली असता तो डबा ठेवून ती परत जात असताना तेथे असलेल्या मोती कमल शेख (वय-२९) याने हिच्याकडे वाईट नजरेने पाहून तिच्या साडीचा पदर धरल्याची तक्रार सदर महिलेने पनवेल तालुका पोलिस ठाण्यात केली असून त्यानुसार शेखविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात भा.द.वि. ३५४ अतर्गतगुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आज रोह्यात खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते कोरोना योद्धांचा विशेष सन्मान

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

विधान परिषद आ.तथा युवा नेते अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज शनि.दि.१७ रोजी रोहे तालुक्यातील ओम नम:शिवाय मंगल कार्यालय किल्ला येथे दु.३ वा.रायगडचे खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते ज्यांनी कोरोना संकटकाळी तसेच नैसर्गिक चक्रीवादळ आपत्ती अशा संकटकाळात मदतीचा हात दिला अशा संस्था व व्यक्ती यांच्या विशेष सन्मानाचे आयोजन सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दसबा फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस जि.कार्याध्यक्ष मधुकर पाटील,प्रदेश सरचिटणीस विजय मोरे,तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर,रोहे-अष्टमी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे,उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर पं.स.सभापती गुलाब वाघमारे, उपसभापती रामचंद्र सकपाल,रोहे प्रेस क्लब अध्यक्ष शशिकांत मोरे आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती अध्यक्ष महेश बामुगडे व पदाधिकारी रुपेश बामुगडे यांनी दिली आहे.

खांदा वसाहतीमधील विविध समस्या सिडकोने त्वरित मार्गी लावण्याची शिवसेनेची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

खांदा वसाहतीमधील विविध नागरी समस्या सिडको त्वरित मार्गी लावाव्यात अशी मागणी शिवसेनेने सिडको अधिकार्यांच्या समोर घेतलेल्या बैठकीत केली आहे.

शिवसेना खांदा वसाहतीचे शहरप्रमुख सदानंद शिर्के यांनी खांदा वसाहतीमधील विविध समस्या संदर्भात पनवेल विधानसभा संघटक दिपक निकम यांच्या नेतृत्वाखाली सिडकोचे अधिकारी अभियंता अधिक्षक रोकडे यांची भेट घेतली. यावेळी सिडकोचे उप अभियंता मुलांनी, टेकाडे, भालचंद्र उपस्थित होते. यावेळी शहरप्रमुख सदानंद शिर्के यांनी खोदलेले रस्ते, पावसाळी गटार ची साफसफाई, सेवर लाईन चे पाणी व्यवस्थित निचरा होत नसल्याबद्दल व खांदा वसाहती मधील सर्व उद्यानाचे सुशोभीकरण व डागडुजी अशा सर्व समस्या संदर्भात लेखी निवेदन देऊन सविस्तर विचारविनिमय करून सदरहू कामे दसरा सणापुर्वी करून घेतली पाहिजे अशी मागणी केली. तसेच आश्वासन घेतले

यावेळी सदरहू शिष्टमंडळ सोबत उपशहरप्रमुख दत्तात्रेय महामुलकर, शहरसंघटक संतोष जाधव, उपशहरसंघटक संजीव गमरे, विभाग संघटक श्रीहरी मिसाळ, उपविभागसंघटक शिवाजी बंडगर, शाखाप्रमुख से ५ सुनील औटी, से ९ पुंडलिक म्हात्रे,से ११ अतुल घुग, उपशाखाप्रमुख से ११गणेश साबळे व शिवसैनिक संपत सुवर्णा इ . हजर होते.

काढणीला आलेला हातचा पिक भिजल्याने शेतकरी मेटाकुटीला!

पावसाच्या लहरीपणाचा सर्वच पिकांना बसला तडाखा

दै.रायगड नगरी । मिलींद अष्टीवकर

रोहा : चालू वर्षात एका पाठोपाठ एक आलेली संकटे त्यातच परतीच्या पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावून जात असल्याचे पाहणे रायगड सह कोकणातील सर्व शेतकऱ्यांच्या नशिबी आले आहे. राज्यातील सर्व धार्मिक देवस्थाने बंद आहेत. यामुळे देवाच्या दारी जाऊन त्याचा धावा करणे शक्य नाही. पण नको देवराया अंत आता पाहू अशी विनवणी शेतकरी वर्ग करत आहे. तर माजी आमदार पंडित पाटील यांनी ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी केली आहे.

गुढीपाडव्या पासून संपूर्ण देशात लॉकडाऊन जाहीर झाल्याने शेतीमालाला उठाव मिळाला नाही. लग्नसराई न झाल्याने तसेच बाजारपेठा, हॉटेल बंद असल्याने डाळी, कडधान्ये यासह फुले, भाजीपाला, नारळ यांना उठाव नाही. त्यातच शहरात रोजगारासाठी गेलेली मंडळी रोजगार ठप्प झाल्याने गावी आल्याने ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाच्या आर्थिक परिस्थिती ओढग्रस्त झाली. तरी हिंमत न हारता शेतकरी वर्गाने खरिपाच्या पेरणीची तयारी केली. पण निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा कोकणात बसला. येथील आंबा, काजू, नारळ, सुपारी पिकवणारा शेतकरी अक्षरशः उद्धवस्त झाला. वाडवडीलांनी मोठ्या केलेल्या बागा नष्ट झाल्या. शासनाचे पाहणी दौरे झाले, तुटपुंजी मदत मिळाली. अजून अनेकांना ती मिळालेली नाही. उध्वस्त घरे, शेती, बागा यांचे दु:ख सावरत कोकणात शेतकऱ्यांनी भाताची लागवड केली. पर्जन्यमान मागील चार महिने बऱ्यापैकी असल्याने भाताचे पिक हाती येईल अशी आशा होती. पण गेला आठवडाभर झालेल्या पावसामुळे भाताचे पिक मातीमोल झाले आहे. भाताचे पिक कापणे व त्याची मळणी करण्याचा खर्च देखील निघणार नाही अशी शेतकरी वर्गाची भयावह परिस्थिती आहे.

> शासनाने आता पंचनाम्याचे फार्स न करता सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना पुढील वर्षभर शासनाने मोफत धान्य द्यावे. तसेच शेती संबंधित सर्व कामांचा मनरेगा मध्ये समावेश करावा. जेणेकरून शेतकऱ्यांना पुन्हा शेती करण्यासाठी उमेद मिळेल. तसेच शासनाने शेतकऱ्यांना मोफत किंवा सवलतीच्या दरात बियाणे उपलब्ध करून द्यावे. १०० युनिट पर्यंत विज बिल माफ करावे.
>
> **-पंडित पाटील, माजी आमदार**

वाहनचालकांना मास्क व सॅनीटायझर्सचे तसेच वाहतुक नियमांबाबत पत्रके वाटप करुन वाहनचालकांचे प्रबोधन

दै.रायगड नगरी । पनवेल

वाहनचालकांचे वाहतुक नियमांबाबत प्रबोधन व्हावे याकरीता भुषण उपाध्याय सो . अप्पर पो-लीस महासंचालक वाहतुक महाराष्ट्र राज्य मुंबई, यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे विजय पाटील, पो-लीस अधीक्षक (मुख्यालय) व डॉ.दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक महामार्ग पोलीस ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सुदाम पाचोरकर पोलीस निरीक्षक महामार्ग पनवेल व सपोनि सुभाष पुजारी, महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे यांचे मार्फत खालापुर टोलनाका येथे वाहनचालकांना फेसमास्क व सॅनिटायझर्स चे वाटप करण्यात आले.

तसेच वाहतुक नियमांबाबतच्या माहितीबाबतची पत्रके वाटप करीत वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे होणार्या अपघाताबाबत माहिती देवुन अपघातसमयी मदत करण्याबाबत सुचना दिल्या तसेच वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्यास करण्यात येणार्या दंडात्मक कारवाईबाबतची माहीती देवुन वाहनचालकांचे मोठया प्रमाणात प्रबोधन करण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक सुदाम पाचोरकर, सपोनि सुभाष पुजारी, पोउपनिरीक्षक काकडे व पोलीस कर्मचारी स्टाफ हजर होते असे महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे सहा.पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी सांगितले.

श्रीवर्धन नगरपरिषदेने पाण्याचे योग्य नियोजन न केल्यास एन उन्हाळ्यात पाणी टंचाईची शक्यता

दै.रायगड नगरी । संतोष चौकर

श्रीवर्धन : श्रीवर्धन नगर परिषदेकडून अनेक वेळा पाण्याचे योग्य नियोजन होत नसल्यामुळे श्रीवर्धन शहरातील नागरिकांना एन उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.

श्रीवर्धन शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर रानवली येथे एक पाझर तलाव आहे. या पाझर तलावाचे पाझरणारे पाणी पाईपलाईनद्वारे श्रीवर्धन शहरात आणुन ते उंच टाकीत जमा करून शहरामध्ये पुरविण्यात येते. यावर्षी सरासरीपेक्षा दीडपट पाऊस जास्त झाला आहे. त्यामुळे रानवली धरण जवळजवळ पूर्णपणे भरलेले आहे. मात्र सध्या अजूनही पावसाळा सुरु असल्यामुळे नगरपरिषदेकडून शहरामध्ये जास्त वेळ पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यामुळे शहरातील बरेचसे नागरिक आपल्या गाड्या धुण्यासाठी किंवा अंगणातील लादी धुण्यासाठी नळाच्या पाण्याचा वापर करतात. रानवली पाझर तलावापासून श्रीवर्धन येथील साठवण टाकी पर्यंत येणाऱ्या जलवाहिन्या अत्यंत जुन्या झालेल्या आहेत. त्यामुळे त्या वारंवार फुटण्याचा प्रकार घडतो, त्यामुळे देखील मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. तसेच श्रीवर्धन शहरात टाकलेल्या जलवाहिन्या देखील खूप जुन्या झालेल्या असल्यामुळे त्या अनेक वेळा फुटतात व पाणी वाहून जाण्याचा प्रकार नियमितपणे घडत असतो. श्रीवर्धन शहराला शुद्ध पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी निधीची तरतूद असून सुद्धा केवळ जागा उपलब्ध होत नसल्यामुळे हा प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला आहे.

फक्त श्रीवर्धन नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली की सर्व राजकीय पक्ष शहरातील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल अशा प्रकारची घोषणा करतात व तसे आपल्या वचननाम्यामध्ये जाहीर करतात. उन्हाळ्यात देखील बाजारपेठेतील काही नागरिक आपल्या गाड्या नळाच्या पाण्याने धुतात तर रस्त्यावरील धूळ आपल्या दुकानात येऊ नये यासाठी रस्त्यावर देखील नळाचे पाणी मारण्याचे प्रकार करत असतात. श्रीवर्धन नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने या सर्व गोष्टींवरती योग्य निर्बंध घालून पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन केले तरच उन्हाळ्यात श्रीवर्धन शहराला मुबलक पाणी पाणी उपलब्ध होऊ शकेल. अन्यथा उन्हाळ्यामध्ये शहराला पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रसायनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसदर्भात जिल्हाधिकारी यांची घेतली बैठक

दै.रायगड नगरी । पनवेल

रसायनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात विभागीय कोकण आयुक्त यांच्या आदे-शानुसार जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी व्ही.सी.आर.द्वारे त्रैमक उपविभागीय कार्यालय पनवेल येथे बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीत गरजेपोटी बांधलेली घरे, विखुरलेली घरे व शेतकऱ्यांच्या वहिवाटात, ताब्यात असलेल्या शेतीबाबत सकारात्मक चर्चा झाली. चर्चा करीत असताना प्रामुख्याने पनवेल उरण मतदार संघातील माजी आमदार मनोहररोठ भोईर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले कि, तुम्ही जिल्हयाचे पर्यायाने आमचे पालक आहेत. तेव्हा पालक या नात्याने शासनाकडे सकारात्मक प्रस्ताव देताना योग्य पुनर्वसन संपादित १६०० एकर जमिनीचा ३०% मोबदला व भूखंड व इतर सर्व सोयी सुविधा ६० वर्षापासून वंचित शेतकर्यांना मिळणे क्रम प्राप्त आहे. तसेच सध्या एच.ओ.सी. कॉलनीत असलेले साई बाबा मंदिर, दुर्गा माता मंदिर, हनुमान मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, स्मशानभूमी हे पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय बंद करता येणार नसल्याचे सांगितले. तसेच उरण पन-वेल महाविकास आघाडी तथा दि. बा.पाटील प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कॅबिनेट मंत्री मंडळाच्या बैठकीत शेतकर्यांचा निर्णय घेण्याचा ठराव पारित करण्यात येईल असे विनंती केल्याचे सांगितले हा निर्णय होईपर्यंत बी.पी.सी.एल. व एच.ओ.सी. कंपनीने कोणत्याही प्रकारचे काम करण्यात येऊ नये. अन्यथा तीव्र आंदोलन होईल असे स्पष्ट केले. जिल्हाधिकारी रायगड, व्ही.सी.आर.द्वारे आयोजित केलेल्या बैठकीत माजी आमदार मनोहरशेठ भोईर, अध्यक्ष तात्यासाहेब म्हसकर, उपाध्यक्ष रमेश पाटील चिटणीस काशिनाथ कांबळे, सहसचिव समीर खाने, कोषाध्यक्ष दत्ता शिंदे तसेच संघटनेचे अनंत नारायण पाटील, गणपत पाटील, रघुनाथ पाटील, नारायण पाटील, पांडुरंग गाताडे, दत्ता खाने, रवी खाने इ. उपस्थित राहून भाग घेतला होता.

माणगांवचे नवनियुक्त पोलीस उपविभागीय अधिकारी प्रविण पाटील यांनी पदभार स्विकारला

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

माणगांवचे पत्रकार यांनी नुकतेच नवनियुक्त पोलीस उपअधिक्षक प्रविण सुरेश पाटील यांची सदिच्छा भेट घेत पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना माणगांव मध्ये कायदा आणि शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष लक्ष घालणार असल्याचे डिवायएसपींनी सांगितले आहे तसेच वाहतूक कोंडी तसेच अपघात होऊ नये या दृष्टीकोनातून मा. पोलीस अधिक्षक यांचे सुचनांनुसार वाहतुक नियमावलीची कडकपणे अंमलबजावणी केली जाईल असे सांगितले.

तसेच पत्रकारांनी हेलमेट सक्ती बाबत प्रश्न विचारले असता हेलमेट हे दूचाकी चालकांचे सुरक्षिततेसाठीच आहे, ही गोष्ट प्रत्येकाने लक्षात घ्यावी खरतर सक्ती नसून ती आपलीच सूरक्षा आहे. त्यामुळे प्रत्येकाने या नियमांचे पालन करावे. यासाठीही विशेष जनजागृतीची आवश्यकता आहे.

निसर्ग चक्रीवादळाने स्मशानभूमीचे छप्परच पाईपांच्या खांबासकट उडाले

पिरवाडी आदिवासींवर ऊन-पावसातच मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची पाळी

दै.रायगड नगरी । उरण

निसर्ग चक्रीवादळाने स्मशानभूमीचे छप्परच पाईपांच्या खांबासकट उडाल्यामुळे उरण तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या पीरवाडी आदिवासींवर ऊन-पावसातच मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची पाळी येऊन ठेपली आहे.उरण तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत पीरवाडी आदिवासी वाडी आहे.या आदिवासी वाडीत ४८ कुटूंब वास्तव्य करीत असुन त्यांची संख्या अडीचशेच्या आसपास आहे.

द्रोणागिरीच्या पायथ्याशी आणि उरण येथील ओएनजीसीच्या सरंक्षक भिंतीच्या बाजुलाच वसलेल्या पिरवाडी आदिवासीवाडीसाठी समुद्र किनाऱ्यावरच स्मशानभुमी उभारण्यात आली आहे.मात्र सहा महिन्यांपूर्वी आलेल्या निसर्ग चक्रीवादळात

स्मशानभूमीचे पाईपचे खांब छप्पर सिमेंटच्या पत्र्यासह उडाल्याने स्मशानभुमी उघडी पडली आहे. त्यामुळे छप्पराअभावी उघडल्या पडलेल्या स्मशानभुमीतच ऊन-पावसातच आदिवासींना मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची पाळी नातेवाईकांवर आली आहे.

स्मशानभुमीच्या दुरुस्तीची मागणी आदिवासींकडून करण्यात आली आहे.मात्र ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आदिवासींकडून केला जात आहे. चक्रीवादळात स्मशानभूमीचे झालेल्या सात लाखांच्या आर्थिक नुकसानीची मागणी उरण तहसीलदारांकडे करण्यात आली आहे.मात्र आर्थिक नुकसानीची रक्कम अद्यापही मिळाली नसल्याने स्मशानभूमीची दुरुस्ती करणे शक्य झाले नसल्याची माहिती नागाव ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी किरण केणी यांनी दिली आहे.

श्रद्धा फाऊंडेशन तर्फे गरजवंताना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे

माथेरान : कर्जत तालुक्यातील श्रद्धा फाऊंडेशन तर्फे नेरळ येथील फॉर्म हाऊस येथे दिव्यांग व गरीब गरजू व्यक्तींना जीवनोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. नेरळ व परिसरातील ४७ व्यक्तींना आज कोव्हींड १९ चे नियमांचे पालन करीत बेरोजगार दीव्यांग व गरीबांना साहित्य वाटप करण्यात आले.

या प्रसंगी श्रद्धा फाऊंडेशनचे मुंडे, धुव सर, गुरु सर, म्हसे सर उपस्थित होते. त्याचप्रमाणे वैजनाथ केंद्राचे केंद्रप्रमुख नारायण सोनवणे व अध्यक्ष श्री अरुण जोशी अपंग संस्था वारे यांनी विशेष सहकार्य करून दिव्यांग व गरजू व्यक्तींची भेट घेऊन कार्यक्रमास उपस्थिती वाढविली .या प्रसंगी जवळ जवळ ४७ व्यक्तींनी आज याचा लाभ मिळाला. या पूर्वी कर्जत तालुक्यात विविध भागात या माध्यमातून समाजकार्य करून साहित्याचे वाटप केलेले आहे.